महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जा.क्र.शिउसं/पुवि /उमाशि/४०१/११ वी प्रवेश /२०२२ दि.१३/०५/२०२२

**परिपत्रक**

प्रति,

**मुख्याध्यापक /प्राचार्य,**

पुणे व पिंपरी -चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील

उच्च माध्यमिक विद्यालये/ कनिष्ठ महाविद्यालये (सर्व)

**विषय:-इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२२-२३ साठी माहितीत सुधारणा/बदल करणेबाबत**

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्र. प्रवेश-२०१८/प्र.क्र.३३३/एसडी-२, दि.२३/०६/२०२०

२)मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.) यांचे पत्र क्र.विद्या-ए-१/११ प्रवेश/२०२२/२४१८, दि.१३/०४/२०२२

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की राज्य मंडळाच्या इ. १० वी च्या परीक्षा समाप्त झालेल्या असून इ.१० वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२२-२३ मधील प्रवेशाची पूर्वतयारी सुरु करणेबाबत संदर्भ पत्र क्र.२ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये संदर्भात आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या आधी भरलेल्या माहितीत आवश्यक सुधारणा/ बदल करावयाचा असल्यास ( उदा. नवीन शाळा रजिस्ट्रेशन, तुकडी वाढ/ कमी होणे, विषय वाढ/ कमी होणे, शुल्क वाढ/कमी होणे, मुख्याध्यापक/ प्राचार्य यांचे नावात बदल, इमेल आय डी बदल इ.) साठी online सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. त्यानुसार आवश्यक कागदपत्रे तपासण्यासाठी व बदल प्रमाणित करून upload करण्यासाठी आर.सी.एम. गुजराथी हायस्कूल व ज्यू. कॉलेज, पुणे येथे दि. १८/०५/२०२२ ते दि.२०/०५/२०२२ या कालावधीत स.१०.०० ते सायं ६.०० पर्यंत शिबीर आयोजित केलेले आहे.

तरी संबंधित कनिष्ठ महाविद्यालाच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिबिरासाठी आवश्यक मूळकागदपत्रांसह खालील वेळापत्रकानुसार उपस्थित राहावे.

| अ.क्र. | दिनांक | झोन क्र. | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दि.१९/०५/२०२२ | झोन क्र.१ व २ | स. १० ते २ |
| | | झोन क्र.३ | दु.३ ते ६ |
| २ | दि.२०/०५/२०२२ | झोन क्र.४ व ५ | स. १० ते २ |
| | | झोन क्र.६ | दु.३ ते ६ |
| ३ | दि.२१/५/२०२२ | झोन क्र.७व८ | स. १० ते २ |
| | | झोन क्र.९ | दु.३ ते ६ |

करावयाच्या बदलासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी संगत जोडलेली आहे. त्यानुसार मूळ कागदपत्रे सादर करावीत. सदर कागदपत्रे नसल्यास बदल स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. सदर शिबिरासाठी मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी वरील वेळापत्रकानुसार वेळेत उपस्थित राहावे.प्रतिनिधी पाठवू नये.

ज्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या माहितीत कोणताच बदल नाही त्यांना संकेत स्थळावर No change प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले जाईल. त्यांनी शिबिरास येण्याची आवश्यकता नाही.

(मीना शेंडकर)
सहाय्यक संचालक
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
पुणे विभाग,पुणे

प्रत; माहितीस्तव सविनय सादर

मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत; माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव

१) शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.पुणे,
आपल्या अधिनस्थ पुणे व पिंपरी -चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालये/ कनिष्ठ महाविद्यालये यांना सदर शिबिरासाठी उपस्थित राहणेबाबत आपल्या स्तरावरून सूचना द्याव्यात.
आपल्या अधिनस्थ सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक यांना उपस्थित राहणेबाबतआपल्या स्तरावरून आदेशित करावे.

२) प्राचार्य, आर.सी.एम. गुजराथी हायस्कूल व ज्यू. कॉलेज, पुणे

## कनिष्ठ महाविद्यालयाच्या आधी भरलेल्या माहितीत आवश्यक सुधारणा/ बदल करण्यासाठी आवश्यक असलेली मूळ कागदपत्रे

१) **नवीन शाळा रजिस्ट्रेशन** – १) शासनाचे परवानगी पत्र, शुल्क ठराव (२विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी दिलेले प्रथम मान्यतापत्र?)

२) **तुकडी वाढ/ कमी होणे**– तुकडी मंजुरीचे शासनाचे पत्र व विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे पत्र

३) **विषय वाढ/ कमी होणे**– विषय मंजुरीचे विभागीय मंडळाचे पत्र विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे पत्र

४) **शुल्क वाढ/कमी होणे(विना अनुदानित व स्वयं अर्थसहाय्यीत शाळांसाठी)**- महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११, अधिसूचना दि.१३/०४/२०१६ नुसार पालक शिक्षक संघाच्या बैठकीत झालेला ठरावाची प्रत, त्यास कार्यकारी समितीची मंजुरीची प्रत, सर्व बैठकींचे व्हिडीओ शुटींग , पूर्वीचे शुल्क, शिक्षकांचे पगार व इतर सोयी सुविधांवर होणारा खर्च याचे बँकेचे अभिलेखे , लेखापरीक्षणाचा अहवाल इ.

५) **संकेतांक बदल**- विभागीय मंडळाचे पत्र

६) **मुख्याध्यापक/ प्राचार्य यांचे नावात बदल, इमेल आय डी बदल**- संस्थेचे व मुख्याध्यापकाचे पत्र

७) **संस्थेच्या नावात बदल**- हस्तांतरण संदर्भात शासन निर्णय व विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे आदेश

८) **कनिष्ठ महाविद्यालयाच्या पत्त्यात बदल**-स्थलांतर संदर्भात शासन निर्णय व विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे आदेश